# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. वर्षा बालगोपाल

---

एक सूर होऊनी, गाऊ सारे सात सूर
श्वेत रंग फेकतो, सप्तरंगी रत्नचूर ॥

सप्तपदी हर्षाची ही चालतो पहा अशी
सात फेरे घेऊनी, अग्नी साक्ष ही जशी
सात जन्माची साथ, सहचारिणी तशी
सात वचनात बद्ध, स्वरांकित ही खुषी
सुरात सूर मिसळूनी भारलेला हा ऊर
श्वेत रंग फेकतो, सप्तरंगी रत्नचूर ॥१॥

सप्त माता पुजूनी, मांडलेला यज्ञ हा
सप्तशती रियाज, वाङमयीस स्वाहा:
सप्तदिन सप्ताहाचे संगीतासी अर्पिलेले
सात चक्रे जागवूनी, साधनेत घोळलेले
बंद लोचनात त्या, व्यथा सा-या होती दूर
श्वेत रंग फेकतो, सप्तरंगी रत्नचूर ॥२॥

सात नवल असले तरी, आठवे नवल गीत
सात सागर लंघूनी, जागवे मनीची प्रित
सात ऋषींचे स्थान, अबाधित राहिले
सात संत हे जणू, संथ साथी भावले
सात अश्व सूर्याचे हे, उधळतात चौखूर
श्वेत रंग फेकतो, सप्तरंगी रत्नचूर ॥३॥

Anahat Music Therapy